# फळशास्त्र विभाग
## उद्यानविद्या विद्याशाखा
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला


क्र.वि.प्र./फ.शा./रोपवाटिका/ २९३ /२०२२ दि. १४ /०७/२०२२

## दर पत्रक

प्रती,

सर्व संबंधित ठेकेदार

..........................................

..........................................

**विषय: सीताफळ व चिकू फळपिकांचे कलमीकरण बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून सिताफळ व चिकू या फळझाडांचे कलमीकरण (खुंट रोपांच्या पुरवठ्यासह) करण्या करिता दरपत्रके खालील प्रमाणे या कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्याचे करावेत.

| अ.क्र. | कामाचे विवरण | शेरा |
|---|---|---|
| १ | सीताफळाची शेंडा कलम बांधणी (Grafting) (खुंट रोपांच्या पुरवठ्या सह) | कलम बांधणीच्या कामाचा मोबदला हा दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, या मध्ये ५०% रक्कम रोपांचा पुरवठा केल्या नंतर तर, उर्वरित ५०% रक्कम हि कलमे यशस्वी झाल्या नंतर यशस्वी कलमांच्या आधारे अदा करण्यात येईल. |
| २ | चीकू शेंडा कलम बांधणी (Grafting) (खुंट रोपांच्या पुरवठ्या सह) | |

टिप: सर्व दर पत्रके दि. २२/०७/२०२२ रोजी साय. ५.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास खालील पत्त्यावर विहित मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत पोहचविण्याचे करावे.
उशिरा प्राप्त दर पत्रके ग्राह्य राहणार नाहीत.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती**

१. दर पत्रके मोहरबंद लिफाफ्या मध्ये सादर करावीत.

२. लीफापाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात **'दर पत्रक:- सीताफळ व चिकू कलमीकरण '** असे नमूदकरावे तसेच दर पत्रका मध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्रक क्र. वि.प्र./फ.शा./रोपवाटिका/ २९३ /२०१९ व दि.१४/०७/२०२२ नमूद करावा.

३. ठेकेदाराने या पूर्वी शासकीय अथवा निमशासकीय कार्यालया मध्ये सदरचे काम केल्या बाबत चा कामाचा आदेश सोबत जोडणे बंधनकारक आहे.

४. देयक सादर करतांना, जी.एस.टी. संबधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची स्वतःची असेल.

५. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance)ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/ स्वीकारणार नाही.

६. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व या बाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

८. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतःस्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.

९. संबंधित ठेकेदाराने कामाचे दर हे किती दिवसा करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमूद करावे अन्यथा सदरचे दर हे ३१ मार्च २०२३ पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.

१०. **कलम बांधणीच्या कामाचा मोबदला हा दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, पन्नास टक्के (५०%) रक्कम रोपे नर्सरी मध्ये पोहचविल्या नंतर तर, उर्वरित (५०%) रक्कम हि यशस्वी कलामांच्या आधारे अदा करण्यात येईल.**

११. यशस्वी झालेल्या कलाम मोजून देण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची असेल.

१२. दर पत्रक मंजूर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

१३. या प्रक्षेत्रावरील कलमे व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.

१४. या दर प्रक्रीये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.

१५. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबत चे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्या सह दर पत्रक सोबत जोडणे आवशक आहे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला